# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**परिपत्रक क्र. ३२४/२०१९**

**प्रा. जी. बी. कुलकर्णी अवॉर्ड फॉर दी बेस्ट टिचर इन कॉमर्स पारितोषिक**

**(नाशिक जिल्हयाकरीता)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ''प्रा. जी. बी. कुलकर्णी अवॉर्ड फॉर दी बेस्ट टिचर इन कॉमर्स'' पारितोषिक दरवर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील तीन जिल्हयांमध्ये आलटून पालटून दिले जाते. शैक्षणिक वर्ष २०१९–२० वर्षासाठी नाशिक जिल्हयातील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील वाणिज्य विषयातील शिक्षकांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. **दि. ०७ जानेवारी २०२०** पर्यंत शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे प्रत्यक्ष हस्तपोच अर्ज सादर करावे.

पारितोषिकासाठी आवश्यक असलेले नियम, अटी व इतर माहिती पुढीलप्रमाणे आहे :

१) पारितोषिकाचे नांव : ''प्रा.जी.बी.कुलकर्णी अवॉर्ड फॉर दी बेस्ट टिचर इन कॉमर्स''

२) पारितोषिकाची रक्कम रुपये १,६००/–

३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील ज्या महाविद्यालयात वाणिज्य अभ्यासक्रम शिकविला जातो, त्यांच्या प्राचार्यांनी वाणिज्य विषयातील पात्र शिक्षकाची (फक्त एकच) शिफारस करावी. (मा. अधिष्ठाता, मा. शैक्षणिक विभागप्रमुख व मा. प्राचार्य या पारितोषिकासाठी अर्ज करु शकतात.)

४) पुणे, मुंबई किंवा इतर कोणत्याही मान्यवर विद्यापीठाची एम. कॉम. पदवी प्रथम प्रयत्नात किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

५) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील संलग्न महाविद्यालयात वाणिज्य विषय शिकविण्याचा कमीतकमी दहा वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६) संबंधित शिक्षकास संशोधनात्मक प्रबंध, त्यासंबंधीचे प्रकाशन अथवा संशोधनात्मक लेखन इत्यादीचा अनुभव असावा.

७) संबंधित शिक्षकाचा महाविद्यालयातील चांगल्या कार्यक्षमतेचा व वर्तणूकीसंबंधीचा गोपनिय अहवाल मा. प्राचार्य यांनी अर्जासोबत पाठविणे आवश्यक आहे. इतर कोणतेही उल्लेखनीय योग्यतेच्या कार्याचा अहवाल सादर करावा. (सोबत पाकीटावर गोपनीय अहवाल असा उल्लेख करावा.)

८) विद्यापीठातील विभागप्रमुख किंवा महाविद्यालयाच्या प्राचार्यांना स्वत:चा प्रस्ताव पाठवावयाचा असल्यास तो मा. विभागप्रमुखांनी मा. कुलगुरु यांच्यामार्फत व मा. प्राचार्य यांनी संस्था चालकांमार्फत पाठवावा.

९) प्राध्यापक हा पूर्णवेळ कार्यरत असणे आवश्यक आहे.

१०) हे पारितोषिक सन २०१९–२० या वर्षासाठी फक्त नाशिक जिल्हयातील संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांसाठी राहील.

पारितोषिक वितरण समारंभ प्रतीवर्षाप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनी आयोजित करण्यांत येईल.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे – ०७
संदर्भ :शै. प्रवेश/४५४२
दिनांक : १८/१२/२०१९

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :

मा. प्राचार्य, नाशिक जिल्हयातील संलग्न वाणिज्य महाविद्यालये.

सदर परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावे.

D:\SPPU SCHOLARSHIP DATA\2019-20\Award\G. B. Kulkarni\CIRCULAR